# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 19/02/2021 (गुरूवार)

(दुपार)

---

### अपघातात मृत्यु

पो.स्टे. कुही :– अंतर्गत 04 कि.मी. अंतरावरील मौजा सावळी बसस्टॉप येथे दिनांक 16/02/2021 चे 22:20 वा. ते 22:50 वा. दरम्यान गणेश राजेराम लांबट(मृतक) वय 45 वर्ष, रा. उमरेड व त्याचा मुलगा नामे– तेजस लांबट, वय 16 वर्ष हे दोघेही एमएच–40/व्ही–3335 क्रमांकाच्या मोटरसायकलने भूगाव वरून उमरेड ला जात होते. त्यादरम्यान मोटरसायकल चालकाने वडोदा ते कुही रोडवरील सावळी बसस्टॉप जवळ आरोपी यांनी उसाने भरलेल्या ट्रॉली क्र. एमएच–44/डी–5135 व एमएच–44/डी–5134 ला मागुन धडक दिली. या अपघातात गणेश लांबट हा गंभीर जखमी होवून त्याचा मृत्यु झाला असून तेजस हा जखमी आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– संतोष बबनराव गिरडकर, वय 45 वर्ष, रा. बुधवारी पेठ उमरेड यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 304 (अ) भादंवी. सहकलम 337 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक सोनटक्के 9422644538 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर